सकाळ



कोल्हापूर : प्राचार्य प्रो. डॉ. ए. एम. शेख यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्र-कुलगुरू, कुलसचिव, वाणिज्य विभागप्रमुख.

# विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीत वारणा महाविद्यालयाचे यश

वारणानगर, ता. २६ : येथे यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयातील २०२२-२३ शैक्षणिक वर्षांत विद्यापीठामार्फत दिल्या जाणाऱ्या शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीत वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेंतर्गत ग्रामीण गटातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये वाणिज्य विभागातील विद्यार्थी अधिक संख्येने गुणवत्ता यादीत आले आहेत. त्यामध्ये वाणिज्य शाखेतील अंकिता पाटील, यादव पूजा, गावडे ऋतुजा, खोत सुप्रिया पाटील, प्रियंका, पोतदार आकांक्षा तसेच कला शाखेतील दळवी समीक्षा, मोरे पौर्णिमा यांची निवड झाली. यासाठी वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम, प्राचार्य प्रो. डॉ. ए. एम. शेख, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. रोहित बसनाईक, डॉ. चंद्रकांत जाधव, प्रबंधक बी. जे. लाडगावकर, शिष्यवृत्ती लिपिक अतिश देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# विद्यापीठात उद्या 'इट राईट मिलेट मेला'

## कुलगुरू डॉ. शिर्के : आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त आयोजन

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठ व भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरण (आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार) यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (ता. २८) 'इट राईट मिलेट मेला' कार्यक्रम होत आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. तंत्रज्ञान अधिविभाग व फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागासह इतर विभागांच्या सहकार्याने कार्यक्रम होत असून, जिजाऊ बहुउद्देशीय सभागृह येथे सकाळी साडेसहापासून विविध उपक्रमांना सुरुवात होईल.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'आंतरराष्ट्रीय भरड धान्य २०२३ वर्षानिमित्त हा कार्यक्रम होत आहे. एरोबिक्सने व्यायाम प्रकाराने कार्यक्रमास सुरुवात होईल. या प्रसंगी मोफत टी शर्ट वाटप केले जाईल. उपक्रमांतर्गत जनजागृतीसाठी विद्यापीठ परिसरात तीन किलोमीटर चालण्याचा 'वाक्याथोन' उपक्रम होणार आहे. सकाळी साडेदहा वाजता मुख्य उद्घाटनाचा कार्यक्रम होणार असून, दुपारी तीन वाजता 'भरडधान्यांचा दैनंदिन आहारात समावेश' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, स्वयंसहाय्यता गटांतर्फे भरड धान्याचे स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. फोटोग्राफी, टेक्निकल पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर मेकिंगसह साप शिडी, दोरी उड्या यासह अन्य प्रकारच्या मनोरंजक पण ज्ञानाशी सांगड घातलेल्या खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. समारोपाचा कार्यक्रम दुपारी चार वाजता होईल.'

पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्चिम क्षेत्र मुंबई सह संचालक के.के.जीथा, उपसंचालक के. यु. मेथेकर, तांत्रिक अधिकारी देवांशी चावला, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली, समन्वयक प्रा. डॉ. इरान्ना उडचान व फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. डी. पाटील उपस्थित होते.

तरूण भारत

# विद्यापीठात उद्या 'इट राईट मिलेट मेला' उपक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, २८ रोजी सकाळी ६.३० वाजता 'इट राईट मिलेट मेला' या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. तीन किलोमिटरच्या 'वाक्योथोन' कार्यक्रमाने याची सुरूवात होईल. राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात दिवसभर मनोरंजन, खेळ, चर्चासत्रांच्या माध्यमातून भरडधान्यांचे महत्त्व पटवून दिले जाईल, तरी जास्तीत जास्त विद्यार्थी व पालकांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, भरडधान्याचे स्टॉल लावण्यात येणार आहेत. फोटोग्राफी, टेक्निकल पेपर प्रेझेंटशन, पोस्टर मेकिंग कॉम्पिटिशन आदी स्पर्धांचे आयोजन केले आहे. भारतीय



- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती
- भरड धान्याविषयी करणार जनजागृती

अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्चिम क्षेत्र मुंबई जॉइंट डायरेक्टर के. के. जीथा म्हणाल्या, भरड धान्याविषयी जनजागृती करण्यासाठी केंद्र सरकारने हा उपक्रम हाती घेतला आहे. डेप्युटी डायरेक्टर के. यु. मेथेकर म्हणाले, 'इट राईट मिलेट मेला' या उपक्रमात भरडधान्यापासून तयार केलेला पिझ्झा खायला मिळणार आहे. जेणेकरून तरूणाई या भरड धान्याकडे आकर्षित होईल. या कार्यक्रमासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील लोक उपस्थित राहणार आहेत.

लोकमत

# कुलसचिवपदासाठी १६ जण स्पर्धेत

## मंगळवारी मुलाखती : विद्यापीठातील चारजणांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदासाठी १६ उमेदवार पात्र ठरले असून, त्यांच्या मुलाखती मंगळवारी होणार आहेत. सातसदस्यीय निवड समिती मुलाखतीची प्रक्रिया राबविणार आहे.

डॉ. विलास नांदवडेकर यांचा कुलसचिवपदाचा कार्यकाळ १७ नोव्हेंबर २०२१ ला पूर्ण झाला. त्यानंतर विद्यापीठाने दोन वेळा या पदाच्या भरतीसाठी प्रक्रिया राबविली. पण,



तांत्रिक कारण आणि एक वेळा निवड समितीला एकही उमेदवार पात्र वाटला नाही. त्यामुळे २० जुलै २०२२ रोजी पुन्हा प्रक्रिया सुरू केली. त्यामध्ये अर्ज केलेल्यांपैकी १६ जण मुलाखतीच्या अंतिम प्रक्रियेसाठी पात्र ठरले. त्यात विद्यापीठातील प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव (वनस्पतिशास्त्र विभाग), उपकुलसचिव संजय कुबल, मुरलीधर भानारकर (इलेक्ट्रॉनिक्स विभाग), क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परीक्षा मंडळाचे संचालक महेश काकडे यांच्यासह धनंजय ठोंबरे, प्रमोदकुमार शिरोटे, रविकुमार नाईक, विजय कुंभार, श्रीकांत अंधारे, प्रकाश पाटील, सचिन कदम, मलिक रोकडे, रिमेथ दायस, बाजीराव पाटील, परशराम शहापूरकर यांचा समावेश आहे.

लोकसत्ता

# उच्चतर शिक्षा अभियान; प्राचार्यांची कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : उच्च व तंत्रशिक्षण विभाग व प्रधानमंत्री राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान कार्यालयामार्फत शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व प्रतिनिधी यांची प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान योजनेसंदर्भात मार्गदर्शन कार्यशाळा विद्यापीठात पार पडली.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात आयोजित या कार्यशाळेत १११ महाविद्यालयांचे एकूण १९२ प्राचार्य व प्रतिनिधी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के हे होते. त्यांनी प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान प्रस्तावाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. रूसा कार्यालयाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. प्रमोद पाब्रेकर, डॉ. अजित तेलवे यांनी अभियानाचा प्रस्ताव तयार करण्यासंबंधी मार्गदर्शन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठात मंगळवारी मॅरेथॉन स्पर्धा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट प्रोग्राम व राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून मंगळवारी (दि. २९) सकाळी ७.१० वाजता मुख्य प्रशासकीय इमारतीपासून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य प्रशासकीय इमारतीमधील पोर्चमध्ये मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत अभिवादन कार्यक्रम होणार आहे. विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

27 AUG 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालयांना मिळणार ५ कोटी अनुदान

## शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत मार्गदर्शन; १११ महाविद्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम-उषा)अंतर्गत देशभरातील ४०१ महाविद्यालयांना प्रत्येकी ५ कोटी रुपये अनुदान देण्यात येणार आहे. त्यासाठी महाविद्यालयांनी प्रस्ताव कसा बनवावा संदर्भात शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले.



उच्च व तंत्रशिक्षण विभाग मुंबई, प्रधानमंत्री राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान कार्यालयामार्फत शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हातील शासकीय, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व प्रतिनिधी यांची प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान योजनेसंदर्भात शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृह मार्गदर्शन कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. पीएम-उषा ही एक चांगली आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी महत्त्वाची योजना आहे.

कार्यशाळेसाठी १११ महाविद्यालयांतील १९२ प्राचार्य व प्रतिनिधी उपस्थित होते. डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेस रूसा कार्यालयाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. प्रमोद पाब्रेकर, डॉ. अजित तेलवे यांनी प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM USHA) प्रस्तावासंबंधी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत जून २०२३ च्या मसुद्यावर चर्चा करण्यात आली. या मसुदयात एकूण पाच घटकांचा समावेश आहे. सत्राच्या शेवटी विविध प्रश्नांना उत्तरे देण्यात आली. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. कार्यशाळेचे नियोजन एस. एस. अडसुळे, उपकुलसचिव महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग यांनी केले.

पुण्यनगरी

# पर्यावरणपूरक जीवनशैली अवलंबा : डॉ. बत्तासे

कोल्हापूर : प्रत्येकाने शाश्वत पर्यावरण जीवनशैलीचा स्वीकार केला, तर पर्यावरणाचे संरक्षण तर होईलच, पण येणाऱ्या पिढ्यांसाठी चांगले भवितव्यही देऊ शकतो. यासाठी प्रत्येकाने दैनंदिन आयुष्यात पर्यावरणीय जीवन पद्धतीचा अवलंब करावा, असे प्रतिपादन उद्योजिका आणि पर्यावरण अभ्यासक डॉ. प्रमिला बत्तासे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागामार्फत यूजीसीच्या युनिव्हर्सिटी कनेक्ट अंतर्गत 'जी २० व पर्यावरणपूरक जीवनशैली' या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी होत्या. प्रास्ताविक डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी केले. सूत्रसंचालन पार्थ यादव यांनी केले. आभार सचिन कामत यांनी मानले.

तरूण भारत

# उद्योजकता विकास यात्रेला उद्यापासून प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाविद्यालयीन युवकांना उद्योजकतेची माहिती व्हावी आणि स्वरोजगार विषयक शासकीय योजना कळाव्यात याकरिता २८ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर दरम्यान स्वावलंबी भारत अभियान कोल्हापूर तर्फे जिल्हास्तरीय उद्योजकता विकास यात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अभियानाचे जिल्हा समन्वयक सीए अनिल चिकोडी व यात्रा प्रमुख दिग्विजय गरड यांनी दिली. उद्योजकता विकास यात्रेची सुरुवात सोमवारी २८ ऑगस्ट सकाळी साडेदहा वाजता शिवाजी विद्यापीठातून होणार आहे. उद्योजकता विकास यात्रेचे उद्घाटन न्यू पॉलीटेक्निक महाविद्यालयात होणार होणार आहे. यानंतर उद्योजकता विकासरथ १२ तालुक्यांतील ४० महाविद्यालयांमध्ये जाऊन व्याख्यान, चित्रफित, पत्रके आदींच्या माध्यमातून युवकांना उद्योजकतेविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. अनेक युवकांना व्यवसाय, उद्योग करण्याची इच्छा असते. परंतु योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे त्यांना व्यवसाय करणे शक्य होत नाही. त्यामुळे स्वावलंबी भारत अभियान कोल्हापूरतर्फे हा उपक्रम घेण्यात येत आहे. व्यवसाय कोणता व कसा निवडावा, व्यवसाय सुरू करण्यासाठीची पूर्वतयारी, शासकीय कार्यालयांमध्ये तसेच बँकांमध्ये कागदपत्रांची पूर्तता कशी करावी आदी मार्गदर्शन यावेळी करण्यात येणार आहे. उद्योजकता विकास यात्रेदरम्यान महाविद्यालय विद्यार्थी आणि लोकांशी संवाद साधून त्यांच्याकडून उद्योजकतेविषयी नव्या कल्पना एकत्र करण्यात येणार आहेत.